# भारतीय बहुपक्ष पध्दती व संमिश्र सरकार

**डॉ. गणेश बापूजी खुणे** राज्यशास्त्र विभाग प्रमूख महात्मा ज्योतिबा फुले कलामहाविद्यालय आष्टी, जि. गडचिरोली

---

**प्रस्ताव ाः-**

आधुनिक लोकशाही राज्यात राजकिय पक्षांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. राजकिय पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पना करता येत नाही. लोकशाहीचे स्वरूप कोणतेही असले तरी राजकिय पक्षांच्या अनिवार्यतेला आपण नाकारू शकत नाही. लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालतो. सार्वत्रिक निवडणूकीत ज्या राजकिय पक्षाला लोकांचा पाठींबा मिळतो. तो पक्ष आपली सत्ता स्थापन करतो तर कमी पाठींबा प्राप्त पक्ष विरोधी बाकावर बसून विरोध पक्षाची भूमिका साकारतो.

भारतीय लोकशाहीच्या संदर्भात राजकिय पक्षपध्दतीचा विचार करतांना बहुपक्षपध्दतीचे दर्शने घडते. भारतात राष्ट्रीय पातळीवरचे तसेच प्रादेषिक स्वरूपाचे विविध राजकिय सक्रिय असतांना दिसतात. अनेक घटकराज्यात अनेक भाषिक प्रादेषिक तसेच अनेक मुददयाचा आधार घेवून पक्ष निर्माण झालेले आहेत. व पर्यायी त्यांना सत्ता उपभोगण्याची संधीही प्राप्त झालेली आहे. असे असले तरी केंद्र स्तरावर मात्र ४० वर्षापर्यंत एकाच पक्षाची एकाधिकारशाही होती. ''भारतात बहुपक्ष पध्दती असली तरी सुरूवातीच्या ४० वर्षाच्या काळात कॉंग्रेस हा एकमेव प्रभावी व शक्तीशाली पक्ष होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापासून ते पुढे ४० वर्षाचा कालखंड विचारात घेतला तर राष्ट्रीय पातळीवर कॉंग्रेस पक्ष हा एकमेव सत्ताधारी पक्ष होता. १९७७ ते १९८० हया जनता पक्षांचा कालखंड सोडला तर भारतात कॉंग्रेस हा प्रभावी शक्तीशाली आणि सत्ताधारी पक्ष म्हणून आणि बाकीचे राजकिय पक्ष कमकूवत, दुर्बल, विरोधी पक्ष म्हणून आळखले जात होते.''[१] अशी स्थिती असल्याने भारतात एकपक्षीय लोकशाही आहे. अशी उपहासात्मक टिका केली जाते. परंतू असा निष्कर्श काढणे चुकीचे ठरते. कारण १९७७ ची निवडणूक व १९८९ च्या नवव्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर संमिश्र सरकार स्थापन झाले. नंतर १९९६ च्या सार्वत्रिक निवडणूकीत व १९९८ च्याही लोकसभा निवडणूकीत संमिश्र सरकार सत्तेवर आलीत. १९९६ ते १९९८ या काळात चार केंद्रीय मंत्रीमंडळे सत्तेवर आलीत. १९९८ मध्ये या राजकिय पक्षांना सोबत घेवून श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी सत्ता सांभाळली. नंतर २००४ व २००९ च्या निवडणूकीतही कॉंग्रेस पक्षाकडे सत्ता हस्तांतरीत झाली. तथापी या सत्तेतही अनेक राष्ट्रीय व प्रादेषिक पक्ष हिस्सेदार होते. व मनमोहन सिंगानी या सर्वत्र पक्षांना सोबत घेऊन १० वर्षपर्यंत राज्यकारभार केला. २०१४ च्या निवडणूकीत मात्र हे चित्र काहीसे बदलते दिसते व तिन दशकानंतर प्रथमच एकाच पक्षाच्या हातात भारतीय जनतेनी सत्तेच्या चाब्या सोपविल्या. एकूणच उपरोक्त स्थिती लक्षात घेता २०१४ ची निवडणूक वेगळी झाली असली तरी केंद्र व बहुतांष राज्यातील स्थिती लक्षात घेता बहुपक्ष पध्दतीमुळे भारतात संमिश्र सरकारला सुरूवात झालेली आहे. आणि भविष्यातही ही संमिश्र सरकारची परंपरा टिकून राहण्याची चिन्हे दिसत आहेत. **यासंदर्भात ऑग म्हणतात,** ''संमिश्र सरकार एकप्रकारे सहायक व्यवसाय आहे. ज्यामध्ये विभिन्न राजकिय पक्षांचे सदस्य सत्ता स्थापन आणि मंत्रीमंडळाच्या निर्मितीकरीता एकत्र येतात. संमिश्र सरकार राजकिय समुदाय तसेच शक्तीचे गठबंधन आहे जो अस्थायी स्वरूपात काही विशिष्ठ प्रयोजनाकरीता असते. राजकिय पक्षांचे हे मिलन सरकारची स्थापना व त्याचे रक्षण याकरीता तयार केले जाते. जे पक्ष मिळून संमिश्र सरकारची निर्मिती केली जाते. ते सर्व पक्ष एका मुलभूत राजकिय कार्यक्रमाशी बांधील असतात.''[२]

संमिश्र सरकारमुळे सांसदिय शासनपध्दती अस्थिर झालेली आहे. संसदेला सर्वोच्च अधिकार या देशातील संविधानाने सोपविलेले आहेत. परंतू संमिश्र सरकारच्या निर्मितीने संसदेला कोणतेही कठीण निर्णय घेता येत नाही. अनेक प्रादेषिक पक्ष स्वत:च्या फायदयासाठी देशहिताकडे दुर्लक्ष करतांना दिसतात. केवळ सत्ता स्वार्थापोटी राजकिय पक्षांच्या आघाडया होत आहेत. ''तत्वशुन्य आणि ध्येयहिन आघाडया जेव्हा सत्ताप्राप्तीसाठी निर्माण होतात. तेव्हा राष्ट्रहीत व राष्ट्रविकास बाजूला सारला जातो. अशावेळी प्रादेषिक पक्ष आपल्या हिताचा आणि अस्मितेचाच केवळ विचार करतात. प्रादेषिक पक्षांचे अस्तित्व आणि त्यांचे प्राबल्य हे आजच्या भारतीय लोकशाहीसमोरील एक नवे आव्हानच बनले आहे.''[३] एकूणच वर्तमानात भारतीय राजकारणाची दिशा प्रादेषिक पक्षांच्या धोरणांवर आधारीत आहे.

भारतात संमिश्र सरकारच्या निर्मितीमागील मुख्य भूमिका कॉंग्रेस पक्षाला सत्तेपासून दुर ठेवण्याकरीता होती. या पक्षाची एकाधिकारशाही संपृष्टात यावी हया हेतूने अनेक राजकिय पक्षांनी एका ठिकाणी गैर कॉंग्रेस गठबंधन निर्माण केले व सत्ता आपल्या हातात घेतली. ''एका विषिष्ट पक्षांच्या भ्रष्ट आणि कार्यक्षम /शासनालाच संधी देण्यापेक्षा अनेक पक्षांच्या आघाडी सरकारचा पर्याय उचित आहे. कारण ते अधिक जबाबदार आणि पारदर्षी असेल. वरकरणी जरी हे सरकार दुर्बल वाटत असले तरी ते निश्चितपणे अधिक लोकशाही स्वरूपाचे आणि संघीय स्वरूपाला अनुरूप ठरेल.''[४] अशा प्रकारची मानसिकता ठेवून कॉंग्रेसला दूर ठेवण्याकरीता संमिश्र सरकारला सुरूवातझाली. पक्षांची विचारधारा काहीसी विभिन्न असली तरी केवळ एका विशिष्ट पक्षाला सत्तेपासून दुर ठेवण्यासाठी असे समिश्र सरकार निर्माण झाले. सोबतच या संमिश्र सरकारमुळे विविध पक्षांच्या जेष्ठ नेत्यांच्या लोकांची एक कमेटी निर्माण होते. तिला 'सुपर कॅबिनेट' म्हणता येईल. संमिश्र सरकारची संपूर्ण धोरणेया समितीदारेच केले जाते. या व्यवस्थेने मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ व्यवस्थेचा ऱ्हास होतांना दिसतो.''सांसदीय व्यवस्थेत मंत्रीमंडळ शासनाची सर्वोच्च संस्था व मुख्यमंत्री त्यांचा प्रधान असतो. किंबहूना या सरकारमध्ये मुख्यमंत्री तसेच मंत्रीमंडळ यावर आघात करणारी स्थिती निर्माण झालेली आहे. संमिश्र सरकारची अनेक राज्यात समन्वय समिती असल्याने ही समिती मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ यांना आदेश निर्गमित करीत असते.''[५]

सांसदिय लोकशाहीत सामुहिक उत्तरदायित्वाचे तत्व अत्यंत महत्वाचे मानले जाते. परंतू वैचारिक विभिन्नतेने या तत्वालाही हरताळ फासला जातो. तसेच अनेक पक्ष एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे जातानांही अनुभवास येते. एका सरकारात एका पक्षाकडे तर दुसऱ्या निवडणूकीनंतर दुसऱ्या पक्षाकडे जाण्याची, पक्ष बदलाची स्थिती दिसून येते. यावरून अनेक सत्ताधारी पक्षांमध्ये तणावपूर्ण वातावरण निर्मिती होते. सर्वच पक्ष स्वताची राजकिय पोळी शेकणाच्या प्रयत्नात

असतात. पर्यायी मतभेद विकोपाला जावून अस्थिरतेची स्थिती निर्माण होते. कित्येकदा याची प्रचिती सरकारच्या पतनात होते व सरकार कोसळून नव्याने निवडणूका घ्यावा लागतात. एकूणच या निवडणूकांचा आर्थिक बोझा देशातील जनतेलाच सोसावा लागतो.

**निश्कर्ष :—**वर्तमानात केंद्र व राज्यस्तरावर संमिश्र सरकारची स्थापना आपणास अस्थिर शासनव्यवस्थेकडे घेवून जात आहे. मागील दोन दशकानंतर २०१४ च्या निवडणूकीत हे चित्र बदललेले दिसत असले तरी भारतीय पक्षीय राजकारणातून संमिश्र सरकारच्या भुमिकेला व अस्तित्वाला नाकारता येत नाही. संमिश्र सरकारच्या संदर्भात टिकात्मक बाबी अगत्याने समोर येत असल्या तरी भारतीय पक्षीय वर्तमानाला यापासून मुक्त करता येत नाही. त्यामुळे हे असे संमिश्र शासन अधिक परिणामकारक कसे करता येईल याकडे कटाक्षाने लक्ष पूरविणे गरजेचे आहे. यासंदर्भात निवडणूक पूर्व गठबंधन होणे महत्वपूर्ण आहे. त्यामुळे अशा पक्षांना अधिक सत्ता व वैधता प्राप्त होवु शकेल. तसेच प्रत्येक राजकिय पक्षाने आपल्या आघाडी धर्माचे पालन केले पाहिजे. अधिकाधिक जागा प्राप्त होणाऱ्या पक्षाला नेतृत्वाची संधी प्राप्त होणे गरजेचे आहे. संमिश्र सरकारमध्ये निर्माण होणाऱ्या अनेक अडचणी विषयी अगोदरच अनुमान काढून त्यावर उपाययोजना करीत राहणे अनिवार्य आहे. सोबतच अस्थिरतेच्या परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी प्रयत्न होणे क्रमप्राप्त आहे.

उपरोक्त सकारात्मक प्रयत्नांनी वर्तमानात निर्माण झालेल्या संमिश्र शासनाच्या संदर्भात काहीसा प्रयत्न केला जावू शकतो. त्यामुळे असे सरकार अधिक क्रियाशिल व पूर्णवेळ टिकाणारे बनेल. अन्यता भारतीय जनतेला बहुपक्षपध्दतीऐवजी दुसरा पर्याय शोधणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. बी. बी. पाटील, ''भारतीय शासन आणि राजकारण'' पृ. क्र. २७२—२७३
२. बि. एल. फाडिया डॉ. पुखराज जैन, ''भारतीय शासन एवं राजनिती'' साहीत्य भवन पब्लीकेशन आग्रा २००६ पृ. क्र. ६५७—६५८
३. बी. बी. पाटील, ''भारतीय शासन आणि राजकारण'' पृ. क्र. ३०६
४. डॉ. दिवानमोहन, प्रा. देवधर जयंत, प्रा. दिवानविवेक,''भारतातील राज्याचे राजकारण'' विद्या प्रकाशन महाल नागपूर २००४.बी. बी. पाटील, पृ. क्र. १४६—१४७
५. बी. बी. पाटील, ''भारतीय षासन आणि राजकारण'' पृ. क्र. ३६३बि. एल. फाडिया डॉ. पुखराज जैन, ''भारतीय शासन एवं राजनिती'' साहीत्य भवन पब्लीकेशन आग्रा २००६ पृ. क्र. ६६७